**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०९२ दि. २५ /०९ /२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**दुचाकी पार्क करुन गेलेल्या परंतु पार्क केलेले ठिकाण आठवत नसलेल्या दुचाकी चालकाचा शोध घेऊन मालकास दुचाकी परत.**

दि. २५/०९/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील फडगेट बीट मार्शलवरील कर्मचारी पोलीस शिपाई ७७०२ नेवसे, पोलीस शिपाई ४१४३ वालकोळी असे पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग फिरत असताना प्यासा हॉटेलचे बाजुचे गल्लीत, शुक्रवार पेठ, पुणे या ठिकाणी एक ॲक्टीवा मोपेड क्रमांक एम एच. १२ आर. क्यु. ६१६४ ही बेवारस अवस्थेत पार्क असलेली दिसुन आली. नमुद कर्मचारी यांनी सदर गाडीबाबत आजुबाजुचे रहिवाश्यांकडे चौकशी करता गाडी मालकाबाबत कोणत्याही प्रकारची माहीती मिळुन आली नाही.

नमुद कर्मचारी व सहा. पोलीस निरिक्षक, बोबडे यांनी नाकाबंदी ॲपव्दारे सदर ॲक्टीवा मोपेड क्रमांक एम एच. १२ आर. क्यु. ६१६४ या गाडीचे मालकाचा नावपत्ता प्राप्त केला असता तो हनुमंत उर्सुल रा. बिबवेवाडी पुणे असा मिळुन आला.सदर व्यक्तींशी संपर्क साधुन त्यांना फडगेट पोलीस चौकी या ठिकाणी बोलावुन घेण्यात आले. सदर व्यक्तींकडे गाडीबाबत केलेल्या चौकशीमध्ये ते गणपती पाहणेसाठी आले असता, त्यांनी सदरची ॲक्टीवा मोपेड क्रमांक एम एच. १२ आर. क्यु. ६१६४ गाडी पार्क केली होती परंतु गाडी पार्क केल्याचे ठिकाण त्यांना समजुन आले नाही. त्यानंतर त्यांचे पुतणीचे निधन झाल्याने त्यांनी गाडीबाबत तक्रार केली नसल्याचे सांगीतले. सदर गाडीबाबत त्यांचेकडील कागदपत्रांची पाहणी करुन सदरची गाडी त्यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

दिनांक २५/०९/२०१९

**(उत्तम चक्रे)**
पोलीस निरिक्षक, गुन्हे
खडक पोलीस ठाणे, पुणे


पुणे शहर पोलीस आयुक्तालय
खडक पोलीस स्टेशन
९३१, शिवाजी रोड, शुक्रवार पेठ, पुणे -४११०४२
संपर्क : दुरध्वनी क्र.: ०२०-२४४५२०९५/२४४७६४२२
पुणे पोलीस
HONDA
MH12-RQ 6164